# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ

कृषि नगर, वसमत रोड,

परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)

| | | | |
|---|---|---|---|
| ई-मेल | : reg_mau@rediffmail.com | दूरध्वनी | : (०२४५२) २२९७५५ |
| वेबसाईट | : www.vnmkv.gov.in | फॅक्स | : (०२४५२) २२९७५५,२२३५८२ |


**संदर्भ:** १. महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परिनियम,१९९० मधील परिनियम क्र. ८८ (२) व (३)

२. मा. कुलगुरू महोदय, वनामकृवि, परभणी यांनी मान्यता प्रदान केलेली टिपणी दि.१३.०२.२०१९

३. वनामकृवि, परभणी विद्यापीठ कार्यकारी परिषद ठराव क्र.१७/०१.०६.२०१९

४. सहाय्यक आयुक्त मावक औरंगाबाद यांच्याकडून सरळसेवा संवर्गाच्या बिंदुनामावली तपासणीबाबतचा प्राप्त अहवाल क्र.२०२२/मावक/कक्ष-२/सीआर-२६५/कावि, दि.१०.०१.२०२३

**कक्ष अधिकारी व सहाय्यक कक्ष अधिकारी या संवर्गातील पदभरतीच्या प्रमाणात बदल करणेबाबत...**

**क्रमांक२०२३/सं.क्र.४५३/आस्था-३/1581** **दिनांक ०६/०२/२०२३** 07

## विद्यापीठ परिपत्रक

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथील कक्ष अधिकारी/तत्सम व सहाय्यक कक्ष अधिकारी/तत्सम या संवर्गातील नामनिर्देशनाने व पदोन्नतीने करावयाच्या भरतीचे प्रमाण खालीलप्रमाणे होते.

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | पदभरतीचे प्रमाण (टक्के) | |
|---|---|---|---|
| | | नामनिर्देशन | पदोन्नती |
| १ | कक्ष अधिकारी/तत्सम | ५० | ५० |
| २ | सहाय्यक कक्ष अधिकारी/तत्सम | ५० | ५० |

महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परिनियम, १९९० मधील परिनियम ८८ (२) व (३) नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, मा. कुलगुरू महोदय, वनामकृवि, परभणी यांनी कक्ष अधिकारी/तत्सम व सहाय्यक कक्ष अधिकारी/तत्सम या संवर्गात नामनिर्देशन व पदोन्नतीने करावयाच्या भरती प्रमाणात खालीलप्रमाणे बदल करण्यास संदर्भ क्र.०२ नुसार मंजूरी दिली आहे.

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | पदभरतीचे प्रमाण (टक्के) | |
|---|---|---|---|
| | | नामनिर्देशन | पदोन्नती |
| १ | कक्ष अधिकारी/तत्सम | २५ | ७५ |
| २ | सहाय्यक कक्ष अधिकारी/तत्सम | २५ | ७५ |

कक्ष अधिकारी/तत्सम व सहाय्यक कक्ष अधिकारी/तत्सम या संवर्गाच्या भरती प्रमाणात उपरोक्तप्रमाणे केलेल्या बदलासंदर्भातील विषय विद्यापीठ कार्यकारी परिषदेने संदर्भ क्र. ०३ वरील ठरावान्वये एकमताने संमत केला आहे.

तसेच या दोन्ही संवर्गातील नवीन भरती प्रमाणानुसार केलेल्या सरळसेवा बिंदुनामावली नोंदवह्यांची तपासणी मा. सहाय्यक आयुक्त (मावक), औरंगाबाद यांच्याकडून पूर्ण झालेली असून, संदर्भ क्र.०४ नुसार याबाबतचा अंतीम तपासणी अहवाल विद्यापीठास प्राप्त झाला आहे.

त्यानुषंगाने कक्ष अधिकारी/तत्सम व सहाय्यक कक्ष अधिकारी/तत्सम या दोन्ही संवर्गातील नामनिर्देशनाने व पदोन्नतीने पदभरतीच्या प्रमाणात करण्यात आलेले बदल हे दि.०१/०६/२०१९ पासून लागू राहतील.

**मा. कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेने,**

डॉ. धिरजकुमार रा. कदम

कुलसचिव

*मागील पानावर...*

**प्रतिलिपी:** संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि)/संचालक संशोधन/संचालक विस्तार शिक्षण/सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण)/विद्यापीठ अभियंता/नियंत्रक, वनामकृवि, परभणी *यांना देऊन कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक आपल्या अधिनिस्त कार्यालयातील लिपीकवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांच्या निर्दशनास आणून द्यावे.*

*प्रत:*

१. महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे-४११ ००७.

२. मा. कुलगुरू महोदय यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी.

३. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र, वनामकृवि, परभणी *यांना देऊन कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक* **कक्ष अधिकारी व सहाय्यक कक्ष अधिकारी या संवर्गाच्या भरती प्रमाणात करण्यात आलेले बदल...** *या शिर्षकाखाली विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.*